Chh. Shahu Institute of Buisness Education & Research Trust's
V. P. Institute of Management Studies and Research, Sangli.

# <u>दिनांक 21 मे 20 22</u>

## **मराठी भाषा आणि संस्कृती दिन** अहवाल

दिनांक 21 मे 20 22 रोजी व्ही.पी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सांगली येथे मराठी भाषा आणि संस्कृती समृद्धी संवर्धन दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक आणि ग्रंथालय विभाग, अंतर्गत गुणवत्ता आम्ही विभाग, सामाजिक संवेदना जाणीव विभाग, आणि भाषा विभाग यांच्या वतीने हा दिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.





ग्रंथालयातर्फे ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथदिंडीचे औचित्य साधून ग्रंथ पालखी तयार करून त्यामध्ये अतिशय उत्तम दर्जाचे ग्रंथ ठेवण्यात आले होते. महाविद्यालयाच्या आवारामध्ये या दिंडीचे मोठ्या उत्साहाने स्वागत झाले. ढोल ताशा लेझीम यांच्या गजरा मध्ये तसेच टाळ आणि  टाळ्यांच्या गजरामध्ये तुळशी वृंदावनासहित ही दिंडी सांस्कृतिक सभागृहापासून पासून ग्रंथालयापर्यंत आणण्यात आली.





विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत तसेच आपल्या संस्कृतीचे संवर्धन व्हावे याकरता महाराष्ट्रीयन वेशभूषेमध्ये कार्यक्रमाचे प्रभात फेरी चे संयोजन केले होते. तसेच ग्रंथांबद्दल जागृती निर्माण व्हावी यासाठी वाचनाची आवड आणि ग्रंथांचे महत्त्व याबद्दलचे फलक विद्यार्थ्यांच्या हातात सोपवण्यात आले होते. अतिशय उत्साहाने प्रसन्न आणि पवित्र वातावरणामध्ये ही दिंडी निघाली होती.






ग्रंथालयासमोर या पालखीचे पूजन करण्यात आले आणि ग्रंथांचे महत्त्व आणि आपल्या संस्कृतीचे महत्त्व या कार्यक्रमातून विद्‌यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य महाविद्‌यालयातर्फे करण्यात आले.





**डॉ. आर.ए. शिंदे यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने हा दिवस अतिशय उत्साहपूर्ण वातावरणामध्ये साजरा करण्यात आला.**



यशाची भरारी घेताना मातृभाषा, संस्कृती जपा

**दिनांक 29.5.22 रोजी दैनिक पुढारी मध्ये याविषयी बातमी प्रसिद्ध झाली.**

---

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रा.एस.एस.जाधव** | **डॉ.सौ.अपर्णा मकरंद कुलकर्णी** | **डॉ.एम.एम.अली** | **डॉ.आर.ए.शिंदे** |
| **उपप्रमुख,सांस्कृतिकविभाग** | **प्रमुख,सांस्कृतिक विभाग** | **वरिष्ठ प्राध्यापक** | **प्राचार्य** |